# प्रेस नोट

प्रति,

--------------------

--------------------

## जळगाव शहरात ई-ए-मिलाद मिरवणुकी मुळे वाहतुकीत बदल

, जळगांव शहरात दिनांक २६/०८/२०२६ रोजी **ईद-ए-मिलाद निमीत्ताने** जळगांव शहरातील शाहु नगर, नेहरु चौक शिवाजी नगर, टॉवर चौक, घाणेकर चौक, भिलापुरा चौकी, सुभाष चौक, बेंडाळे चौक, नेरी नाका, कब्रस्तान अशी मिरवणुक असल्याने आहे.

कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी ईद-ए-मिलाद निमीत्ताने जुलूस [मिरवणुक] ही दिनांक २६/०८/२०२६ रोजी सकाळी ०९.०० ते १२.०० वा. पावेतो दौरा दरम्यान रस्ते व गल्ल्यांमधुन येणा-या सर्व प्रकारच्या वाहनांना सदर दिवशी नमुद वेळेकरीता तात्पुरता प्रवेश बंद आवशयक असुन त्याबाबत मा पोलीस अधीक्षक सो यांनी अधिसुचना म.पो.का.क. ३३[१][ब] अन्वये जारी केली असुन मिरवणुक मार्गाला लागुन असलेल्या लगतच्या बाहय मार्गावरुन वाहतुक दिनांक २६/०८/२०२६ रोजीच सकाळी ०९.०० वाजे पासुन १२.०० वाजे पावेतो वळवणे अधिसुचना मा पोलीस अधीक्षक मा श्रीकांत धिवरे यांनी जारी केल्याने संबंधीत पोलीस स्टेशनला माहिती देण्यात आलेले आहे. वाहतुकीत बदल करण्याच्या ठिकाणी अपघात व कायदा व सुवेस्थेचा प्रश्न निर्माण होवु नये म्हणुन योग्य बंदोबस्त नेमण्यात आला आहे. सुरक्षीत वाहतुकीसाठी पर्यायी मार्गाचा खालील प्रमाणे वापर करण्यात यावा अशी विनंती शहर वाहतक शाखा जळगांव व जिल्हा पोलीस प्रशासना कडुन सर्व वाहन चालक व मालक सर्व सामान्य जनतेस करण्यात येत आहे.

- **एस टी बसेस / अवजड वाहने / कार व मो.सा. करीता मार्ग -**

  १. जळगाव ते चोपडा, यावल, कानळदा, नांद्रा येणारी व जाणारी वाहतुक (एस टी बसेस व इतर अवजड वाहनाकरीता ) - **मार्ग-** स्वातंत्र्य चौक -आकाशवाणी चौक रिंगरोड, सुरेश कलेक्शन [रेल्वे उडडन पुल] मार्गाचा तात्पुरता वापर करतील.

  २. जळगाव ते असोदा, भादली येणारी व जाणारी वाहतुक (एस टी बसेस व इतर अवजड वाहनाकरीता ) - **मार्ग -** स्वातंत्र्य चौक-आकाशवाणी चौक -अजिंठा चौक -कालींका माता- जुना खेडी मार्गाचा तात्पुरता वापर करतील.

  ३. नविन बस स्थानक कडुन कोर्ट चौक- टॉवर चौका कडे जाणारी वाहतुक (हलक्या व मध्यम वाहनाकरीता)- **मार्ग** - ला.ना. चौक -वनिता हॉस्पीटल- गोकुळ स्विट मार्ट,- मार्गे रिंगरोडचा तात्पुरता वापर करतील.

  ४. टॉवर चौक कडुन नविन बस स्थानका कडे येणारी व जाणारी वाहतुक (हलक्या व मध्यम वाहनाकरीता)- **मार्ग-** टॉवर चौक चित्रा चौक, कोर्ट, ला.ना.चौक या मार्गाचा तात्पुरता वापर करतील.

  ५. अजिंठा चौक, एस टी वर्कशॉप, नेरी नाका, बेंडाळे चौक कडे येणारी व जाणारी वाहतुक (हलक्या व मध्यम वाहनाकरीता)- **मार्ग-**अंजिंठा चौक, ईच्छादेवी चौक, आकाशवाणी चौक किंवा अजिंठा चौक, इच्छादेवी चौक, पांण्डे चौक, स्वातंत्र्य चौक या मार्गाचा तात्पुरता वापर करावा.

  ६. शिवाजी नगर कडुन टॉवर चौका कडेस येणारी व जाणारी वाहतुक (हलक्या व मध्यम वाहनाकरीता)- **मार्ग-**गेंदालाल मिल- दुध फेडरेशान, रिंग रोड उडडाण पुलाचा तात्पुरता वापर करावा.

वरील प्रमाणे रस्त्याच्या पर्यायी मार्ग वापर करण्याचे आदेश मा पोलीस अधिक्षक सो यांनी दिलेले आहे. तरी वरिल प्रमाणे वृत्त आपल्या दैनिक वृत्तपत्रात व प्रसार माध्यमाव्दारे प्रकाशित व प्रसारीत होणेस विनंती आहे.

प्रभारी अधिकारी
शहर वाहतुक शाखा जळगांव